**<u>प्रेसनोट</u>** **दि. 25/11/2025**

# ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील शिक्षण उप निरीक्षक यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे परिक्षेत्र** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 56 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | रावसाहेब भगवान मिरगणे वय -57 वर्षे, पद- शिक्षण उपनिरीक्षक, नेमणुक- विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे, सध्याचा पत्ता - ग्रीनव्हील सोसायटी, फ्लॅट नं. ऋ१-808,डीपी रोड,मावळा हॉटेल जवळ, हडपसर,पुणे (वर्ग :- 2) |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 1,00,000/- (एक लाख रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 1,00,000/- (एक लाख रूपये)** |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | **रू. 1,00,000/- (एक लाख रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 17/11/2025 व 21/11/2025 |
| **सापळा दिनांक** | दि. 25/11/2025 |
| **ठिकाण** | विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयामध्ये स्वतःच्या केबिनमध्ये |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, ला प्र वि,पुणे. (मो.क्र. 9923444998) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. सतीश वाळके, सहा.पोलीस आयुक्त, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 8087002020) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांची पत्नी सोलापूर जिल्ह्यात एका माध्यमिक शाळेत सहशिक्षिका म्हणून नोकरीस आहेत. त्यांना शालार्थ आयडी' नसल्याने त्या 2016 पासून विना वेतन काम करत आहेत. त्यांचा शालार्थ आयडी मंजूर झाल्यानंतर त्यांना वेतन चालू होणार होते. सदरचा शालार्थ आयडी मंजूर करण्यासाठी यातील तक्रारदार यांनी त्यांच्या पत्नीचा शालार्थ आयडी चा प्रस्ताव दि.16/6/2025 रोजी त्यांचे विभागाचे शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे, येथे दाखल केला होता. सदरचा प्रस्ताव 'ई- ऑफिस' मार्फत विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे,यांना सादर करण्यासाठी व तो प्रस्ताव मंजूर करून देण्यासाठी विभागीय शिक्षण उप संचालक यांच्या कार्यालयातील शिक्षण उपनिरीक्षक या पदावर कार्यरत असलेले आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे 1 लाख रूपयाच्या लाचेची मागणी केली असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि . 17/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने 17/11/2025 व 21/11/2025 रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली होती. दि.21/11/2015 रोजीच्या विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे, यांच्या कार्यालयात झालेल्या पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक रावसाहेब मिरगणे, शिक्षण उपनिरीक्षक, यांनी तक्रारदाराच्या पत्नीची 'शालार्थ आयडी' मंजूर करून देण्यासाठी 1 लाख रूपयाच्या लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आरोपी शिक्षण उप निरीक्षक लोकसेवक रावसाहेब मिरगणे यांनी आज रोजी 25/11/2025 रोजी 18.21 वा.विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयामध्ये स्वतःच्या केबिनमध्ये तक्रारदाराकडून 1 लाख रूपयाची लाच पंचासमक्ष स्वीकारली असता रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

वरील आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे)**, 9930997700 **(मुंबई)**
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.